नि.फौ.ख.क्र. ५०/२०१९
निशाणी ३८

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव – प्रशांत पांडुरंग शिरोडकर
वय सुमारे – ४८ वर्षे, व्यवसाय–शेती
निवासस्थान–पेंडूर, ता. वेंगुर्ला, जिल्हा– सिंधुदुर्ग.

**सरतपास सहायक सरकारी वकील श्रीमती व्ही.व्ही.ठाकूर यांच्या मार्फत सुरु–**

०१. दिनांक ०७/०५/२०१९ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्याकरीता बोलविले नव्हते. माझी केवळ पंचनाम्यावर सही घेतली होती. (साक्षीदाराला दि. ०७/०५/२०१९ रोजीचा घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) सदर पंचनाम्यामधील मजकूर मला माहीत नाही. त्यावर अनु.क्र.२ वरील सही माझी आहे. **(सहीस निशाणी– पी–२/पीडब्ल्यू२ देण्यात येते.) (सदर कागदातील मजकूर शाबीत करण्याची जबाबदारी अभियोगपक्षावर राहील.)**

**सदर साक्षीदार सरकारी पक्षास सहाय्य करीत नसलेने त्यास सरकारी वकीलांनी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली ती त्यांना देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७/०५/२०१९ रोजी मला पोलीसांनी पेंडूर दळवीवाडी येथे पंचनामा करण्याकरीता बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणाहून आम्ही फिर्यादी यांच्या पेंडूर येथील घर क्र.२७९ येथे गेलो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे फिर्यादी यांनी आमच्यासमक्ष त्यांना आरोपी यांनी रॉडने मारहाण केल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी साक्षीदार प्रकाश गावडे यांना आरोपी झिलू गावडे यांनी हातातील काचेची बाटली फेकून मारली असे फिर्यादीने त्यावेळी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाटलीच्या काचेचे तुकडे तेथे पडलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील पडवीमधील घरगुती साहित्य आरोपींनी विस्कटून टाकल्याचे दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी पोलीसांनी आमच्यासमक्ष एक लोखंडी रॉड, सुमारे साडे चार फूट लांबीचा कणकेचा दांडा, काचेच्या बाटलीचे

तुकडे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर सर्व जप्त वस्तूंवर आमच्या सह्यांचे कागदी लेबल लावले व मुद्देमाल ताब्यात घेतला.

०३. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदर गुन्हयातील साक्षीदार न्हानू उर्फ गोट्या गावडे यांना सोबत घेवून सरकारी वाहनाने साक्षीदार यांच्या पेंडूर येथील ग्रामपंचायत घर क्र. २४० येथे गेलो. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी आरोपी यांनी साक्षीदार यांच्या घरातील महिलांना शिवीगाळ करुन धकलाबुकल केल्याचे साक्षीदार यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी साक्षीदार श्याम गावडे यांच्या घरी जावून त्यांच्या आईवडिलांना सुध्दा शिवीगाळ केल्याचे साक्षीदार यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी सदर घरात प्रवेश करुन साक्षीदार यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचे साक्षीदार यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी संतोश दशरथ गावडे यांनी साक्षीदार शांताराम गावडे यांना रॉड फेकून मारल्याचे साक्षीदार यांनी सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पंच सरकारी वाहनाने जवळ असलेल्या श्रीदेव घोडेमुख देवस्थान प्रवेशद्वारा जवळ गेलो. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार शांताराम गावडे यांनी त्यांना जवळ असलेल्या आंब्याच्या झाडाजवळ आरोपी यांनी लोखंडी रॉड फेकून मारल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा वाचून पाहिल्यानंतर त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री झाल्यावर त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की आरोपी माझ्या गावातील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.डी.व्ही.झांटये यांचेमार्फत नाकारला–**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/–
(एस.जे.चिवटे)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.

दिनांक– २०/११/२०२५